# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# Maharashtra Electricity Regulatory Commission

माहितीचा अधिकार

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर

क्र : मविनिआ/माअअ/30/2018/ 072 दि.02.07.2018

प्रति,
श्री. जयंत पुरुषोत्तम बिवलकर
मानस, नरहर वसाहत,
शिवाजी नगर, रत्नागिरी ४१५ ६३९.

विषय : आपला माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गतचा दि.16.04.2018 रोजीचा अर्ज.

संदर्भ :
1. कार्यालयाचे पत्र क्र. मविनिआ/माअअ/30/2018/556, दि.02.05.2018
2. आपला दि. 11.06.2018 रोजीचा अर्ज

महोदय,

उपरोक्त विषयाच्या संदर्भ क्र. १ नुसार आपणांस कार्यालयातील अभिलेख्यांचे अवलोकन करण्याची मुभा देण्यात आली होती. कार्यालयातील अभिलेख्यांचे अवलोकन करण्यासाठी कार्यालयात येण्याअगोदर कार्यालयास अवगत करावे. तसेच सदर अभिलेख्यांमधील आपणांस आवश्यक असलेल्या दस्तऐवज/पत्रांची छायांकित प्रती पृष्ठ शुल्क रू.२/- या प्रमाणे भरणा केल्यास सदर प्रती आपणांस उपलब्ध करून देण्यात येतील असे कळविले होते.

त्याअनुषंगाने आपण दूध्वनीवरुन जन माहिती अधिकारी यांच्याशी संपर्क करुन कळविले होते की, आम्ही स्वत: कार्यालयात येवून अभिलेख्यांचे अवलोकन करुन आम्हांस हव्या असलेल्या प्रती उपलब्ध करुन घेऊ अथवा माहितीचा अधिकार (फी आणि खर्च विनियमन) नियम, २००५ चे कलम ४ मधील खंड (अ) नुसार शुल्क आकारणी धनाकर्ष भरुन उपलब्ध करुन घेऊ असे कळविले होते.

उपरोक्त संदर्भ क्र. २ अन्वये आपण बँक ऑफ इंडिया रु. ३६७२/- इतक्या रकमेचा धनाकर्ष सोबत पाठवून माहिती उपलब्ध करण्यास कळविले आहे. त्यानुसार आपणांस आवश्यक असलेली माहिती सोबतच्या पत्रासोबत पाठविण्यात येत आहे (एकूण पृष्ठ १८३६).

आपला विश्वासू,

जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी

सोबत :

- रक्कम भरल्याची पावती क्र. 5945, दि.14.06.2018


१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई – ४०० ००५.
13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Colaba, Mumbai - 400 005.
**Tel.:** 022-2216 3964 / 2216 3965 / 2216 3969 **Fax :** 022-2216 3976
**E-mail :** mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in **Website :** www.merc.gov.in / www.mercindia.org.in